वर्ष : ०४ | अंक: ८ | मुंबई, मंगळवार २३ जानेवारी २०१८ ते २९ जानेवारी २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 राज्यातील रस्त्यांवरील खड्डे बुजणार कधी ?

3 → सेल्फीवेडाचं भूत कधी उतरणार ?

शिवसेनेला खूश करण्याचा मुख्यमंत्र्यांचा प्रयत्न ? ← 4



# आयुक्त आणि सत्ताधारी यांच्यातील वाद चव्हाट्यावर




- महापौरांसह १२ पदाधिकाऱ्यांची कार्यालये बंद
- आयुक्तांचा कारभार मनमानी असल्याचा आरोप

**भाईंदर - मीरा-भाईंदर महापालिकेतील सत्ताधारी भाजप आणि प्रशासनाचे प्रमुख असलेले आयुक्त यांच्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेले शीतयुद्ध चव्हाट्यावर आले आहे. आयुक्त मनमानी कारभार करत असल्याचा आरोप करत महापौरांसह उपमहापौर, स्थायी समिती सभापती आणि इतर पदाधिकाऱ्यांनी आपापली कार्यालये बंद केली आहेत. नागरिकांची कामे आता वैयक्तिक कार्यालयातून केली जातील, असे महापौरांनी जाहीर केले आहे.**

आयुक्त आणि सत्ताधारी भाजप यांच्यात गेल्या काही दिवसांपासून सुप्त संघर्ष सुरू आहे. या संघर्षातून तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, मात्र त्याआधीच शुक्रवारी भाजपच्या नगरसेवकाशी संबंधित असलेल्या एका लॉजवर महापालिकेने हातोडा चालवल्याने या संघर्षाचा भडका उडाला. शुक्रवारी महापौरांनी मुख्यालयातील दुसऱ्या मजल्यावरील महापौर दालनाला कुलूप लावले. 'कार्यालय बंद आहे मात्र जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध आहे,' असे स्पष्टपणे या कार्यालयाच्या दरवाजावर लिहिण्यात आले आहे.

महापौरांसह उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, महिला बालकल्याण सभापती आणि उपसभापती तसेच सहा प्रभाग कार्यालयातील सभापती अशी एकंदर १२ कार्यालये शुक्रवारी बंद करण्यात आली. आयुक्त मनमानी कारभार करत असल्याच्या निषेधार्थ दालने बंद करण्यात आली आहेत. मात्र नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी आपण आपल्या वौयक्तिक कार्यालयातून जनतेची कामे सुरू ठेवणार आहोत, असे महापौर डिंपल मेहता यांनी स्पष्ट केले. सर्वच पदाधिकाऱ्यांनी आपली कार्यालये बंद केल्याने महापालिकेत एकदम सामसूम पसरली होती.

## ...आणि वादाला तोंड फुटले

काही महिन्यांपूर्वी आयुक्तांनी बार आणि लॉजवर सुरू केलेल्या कारवाईदरम्यान त्यांच्यात आणि सत्ताधाऱ्यांमध्ये वादाला तोंड फुटले होते. ही कारवाई आपण सांगू त्याप्रमाणे करावी, असा सत्ताधाऱ्यांचा आग्रह होता. आयुक्तांनी मात्र त्यांनी दिलेल्या प्राथमिकतेनुसार कारवाई सुरू केली होती. त्यावेळीही सत्ताधाऱ्यांनी महापालिकेत न फिरकण्याचा इशारा दिला होता. मात्र प्रत्यक्षात तो अमलात आला नाही, परंतु दोघांमधील शीतयुद्ध सुरूच होते. त्यातच काही प्रभाग अधिकाऱ्यांनी आयुक्त अधिकारी देत नसल्याच्या कारणावरून आपली कार्यालये बंद केली, त्यापाठोपाठ वृक्ष प्राधिकरण समिती तयार होऊनही आयुक्त बैठक नसल्याच्या कारणावरून भाजपच्या समितीमधील १० सदस्यांनी राजीनामा दिला होता. यावर तोडगा काढल्यानंतर सदस्यांनी आपले राजीनामे मागे घेतले, परंतु तरीही दोन्ही बाजूंमध्ये धुसपुस सुरूच होती.

# सक्षम लोकलसेवेसाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद

## मुंबई सेंट्रल ते बोरिवलीदरम्यानची सहावी मार्गिका २०२२मध्ये सुरू करण्याचे आश्वासन



**मुंबई - केंद्रीय अर्थसंकल्पात उपनगरीय लोकल सेवा अधिक सक्षम आणि आरामदायी करण्यासाठी भरीव तरतूद करण्यात येईल, असा दावा रेल्वे मंत्री पीयूष गोयल यांनी केला. स्टेशन मास्तर ते सफाई कामगारांपर्यंत सर्व जबाबदारी महिलांवर असलेल्या माटुंगा रेल्वे स्थानकाला गोयल यांनी भेट दिली. त्या वेळी ते बोलत होते.**

संपूर्ण कार्यभार महिलांवर असलेले माटुंगा हे देशातील एकमेव रेल्वे स्थानक आहे. या खुबीमुळे अलीकडेच स्थानकाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली. येथील महिला अधिकारी, कर्मचारी, कामगारांना गोयल/ यांनी शुभेच्छा दिल्या. त्यासोबत लोकलमधून प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर विशेष लक्ष दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. लोकलमधील महिलांसाठी आरक्षित डब्यात सीसीटीव्ही यंत्रणा उभारणी, राज्य रेल्वे पोलीस, रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांचा समन्वय आणि अद्ययावत तंत्रज्ञान याची सांगड घालून महिला सुरक्षेबाबत योग्य ती व्यूहरचना आखली जाईल, असे गोयल यांनी स्पष्ट केले.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनन्सहून लोकलने माटुंगा स्थानकात आलेल्या गोयल यांनी मुंबई सेंट्रल ते बोरिवलीदरम्यानची सहावी मार्गिका २०२२मध्ये सुरू करण्याचे आश्वासन दिले. प्रवास सुखकर व्हावा या उद्देशाने रेल्वे आणि महामार्गाचे जाळे विस्तारण्यावर केंद्र सरकारचा विशेष भर आहे. रेल्वे, महामार्ग पूरक आहेत. त्यामुळे महामार्ग, रेल्वे रूळ शेजारी किंवा जवळपास असल्यास प्रवाशांना सोयीचे ठरू शकेल, असेही त्यांनी सांगितले.

# आर्थिक दरी वाढली!



## देशातील ७३ टक्के संपत्ती १ टक्के श्रीमंतांकडे

**नवी दिल्ली -** भारतातील १ टक्का श्रीमंताकडे देशातील ७३ टक्के संपत्ती असल्याची माहिती समोर आली आहे. तर ६७ कोटी भारतीयांच्या संपत्तीमध्ये फक्त एक टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती एका अहवालातून उघड झाली आहे. भारतातील गरीब आणि श्रीमंतांमधील दरी यानिमित्ताने समोर आली आहे.

दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या पार्श्वभूमीवर ऑक्सफॅम या संस्थेचा 'रिवॉर्ड वर्क, नॉट वेल्थ' हा अहवाल रविवारी प्रसिद्ध झाला. देशातील आणि जागतिक पातळीवरील आर्थिक विषमता या अहवालातून समोर येते. जागतिक पातळीवर गेल्या वर्षभरात तयार झालेल्या एकूण संपत्तीतील ८२ टक्के वाटा हा एक टक्का लोकांकडे गेला. ३ अब्ज ७० लाख लोकांच्या संपत्तीमध्ये काहीच वाढ झालेली नाही. भारततही फार वेगळे चित्र नाही. भारतातील एक टक्का श्रीमंतांच्या संपत्तीमध्ये जवळपास २०. ९ लाख कोटी रुपयांनी वाढ झाली. जगातील १० देशांमधील सुमारे ७० हजार लोकांची मते जाणून घेतल्यानंतर हा अहवाल तयार करण्यात आला आहे. सीईओंच्या पगारात कपात करावी, असे सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ६० टक्के लोकांना वाटते. भारतातील ३७ टक्के अब्जाधीशांकडे वारसाहक्काने संपत्ती आल्याचे अहवालातून समोर येते.

# एप्रिलपासून सरु होणार राज्याची ऑनलाईन लॉटरी




**मुंबई - राज्यात गेल्या अनेक वर्षांपासुन राज्य सरकारची कागदी लॉटरी सुरु आहे. या लॉटरी विक्रीच्या माध्यमातुन शासनाला दरवर्षी २०० ते २१५ कोटी रुपये महसुल मिळत होता. राज्यातील विविध विकासकामांसाठी या महसुलाचा वापर केला जात होता. पण गेल्या तेरा वर्षांपासुन राज्यात सिक्कीम, गोवा, बोडोलँड, अरुणाचल प्रदेश, मिझोरोम आणि आसाममधील ऑनलाईन लॉटऱ्यांचे पेव फुटल्यामुळे कागदी लॉटरीच्या विक्रीवर परिणाम झाला आहे. मराठी लॉटरी विक्रेत्यांवर बेरोजगारीचे संकट निर्माण करणाऱ्या ऑनलाईन लॉटऱ्या बंद करण्यासाठी विविध संघटनांनी पुढाकार घेतला होता. अखेरीस त्यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.**

राज्यात विविध लॉटरी विक्रीच्या माध्यमातुन शासनाला सध्या दरवर्षी १३२ कोटी रुपये मिळत आहे. त्यामध्ये परराज्यातील ऑनलाईन लॉटरीचे १२५ कोटी तर कागदी लॉटरीव्दारे मिळणाऱ्या ७ कोटी रुपयांचा समनवेश आहे. याउलट महाराष्ट्राच्या तुलनेने लहान राज्य असलेल्या केरळला १३०० कोटी रुपये महसुल मिळत आहेत. केंद्र सरकारला लॉटरी विक्रीपासुन २ हजार कोटी रुपये दरवर्षी महसुल मिळत होता. संगणक क्रांतीचा विविध राज्यांमधील लॉटरी चालकांनी लाभ उठवल्यामुळे पुर्वेकडील राज्यांमध्ये ऑनलाईन लॉटऱ्या सुरु झाल्या आहेत.

कागदी लॉटऱ्यांचे ड्रॉ (निकाल) आठवडा किवा महिन्यातुन एकदा लावले जात असत. दिवाळी, दसरा बंपरसारख्या निकालासाठी दोन ते तीन महिने प्रतिक्षा करावी लागत होती. मात्र, ऑनलाईन लॉटऱ्यांचा निकाल दिवसातुन दोन ते तीन वेळा लावला जातो. झटपट निकालांमुळे या लॉटऱ्या लोकप्रिय झाल्यामुळे देशातील कागदी लॉटऱ्यांवर गंडांतर आले आहे. ऑनलाईन लॉटरींच्या माध्यमातुन पुर्वेकडील राज्यांचा वाढणारा महसुल पाहुन आता महाराष्ट्र शासनही ऑनलाईन लॉटरी सुरु करणार आहे.

लॉटरीला जुगाराच्या नजरेतुन पाहीले जात होते. पण महाराष्ट्र आणि केरळने लोकांची दृष्टी बदलली आहे. कागदी लॉटरीच्या महसुलातुन मिळणारी रक्कम राज्यात तलाव, धरणे उभारणीसाठी खर्च केली आहे. महाराष्ट्राच्या या संकल्पनेतुन केरळही नदीवर पुल बांधणी व जलसंपदाच्या कामासाठी लॉटरीतुन मिळणारी महसुल वापरत आहे. त्यामुळे तेथील नागरीक मोठ्या प्रमाणात ऑनलाईन लॉटरी खरेदी करत आहेत. आम्ही केरळ लॉटरीचे मॉडेल राज्यातही आणण्याचा विचार करीत आहोत, अशी माहिती राज्याच्या वित्त विभागाचे प्रधान सचिव विजयकुमार गौतम यांनी सांगितले.



# मंडळाधिकारी अपसंपदेच्या सर्कलमध्ये

**नंदुरबार: आठवडाभरात नंदुरबारात सलद दुसऱ्या अपसंपदेचा गुन्हा दाखल झाला आहे. खोंदामळी येथील मंडळाधिकारी श्रीकांत पोपट बोरसे यांच्यासह त्यांच्या पत्नीवर उत्पन्नापेक्षा ४९ लाख ७५ हजार ४०५ रुपये अपसंपदा बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

सुरज केसरीनगरमध्ये राहणारे व सध्या खोंदामळेचे मंडळ अधिकारी श्रीकांत पोपट बोरसे यांच्याविरुद्ध अपसंपदेची तक्रार होती. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खुली चौकशी सुरु केली होती. चौकशीअंत ज्ञात स्त्रोतापेक्षा श्रीकांत बोरसे यांच्याकडे ४१ लाख ७५ हजार ४०५ रुपये अपसंपदा आढळली.



## सौजन्य व्हॉट्सअप






# राज्यातील रस्त्यांवरील खड्डे बुजणार कधी?



**मुंबई** - राज्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे निष्पाप लोकांचे बळी जात असताना हे खड्डे बुजविण्यास पालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्था अपयशी ठरल्या आहेत. रस्त्यांची देखभाल होत नसेल, तर त्यांच्याविरोधात कारवाई करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे, असे स्पष्ट करून उच्च न्यायालयाने खड्ड्याच्या मुद्द्यावर सरकारला चांगलेच धारेवर धरले. यासंदर्भात काय उपाययोजना केली जाणार आहे, ते दोन दिवसात सांगा, अशी तंबी न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती पी.एम.देशमुख यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला दिली. रस्त्यावरील खड्ड्यांसंदर्भात उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गौतम पटेल यांनी पाठविलेल्या पत्राची दखल घेऊन न्यायालयाने स्वतःहून जनहित याचिकेची दखल घेतली. या याचिकेवर न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती पी.एम. देशमुख यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

यावेळी तक्रार करूनही खड्डे बुजविले जात नाहीत. रस्त्यावर आजही मोठ्या प्रमाणावर खड्ड्यांचे साम्राज्य आहे. पालिकेने तक्रार करण्यासाठी सुरू केलेले ॲपही बंद आहे, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. ३१ डिसेंबरपर्यंत पालिकेकडे खड्ड्यांसंदर्भात आलेल्या २३९ तक्रारींपैकी १५७ तक्रारींचे निवारण केल्याची माहिती पालिकेने न्यायालयाला दिली. तसेच राज्यभरात आलेल्या ५५५ तक्रारींपैकी सुमारे ४७७ तक्रारींचे उद्याप निराकरण झाले नसल्याचे न्यायालयाने अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी खड्ड्यांसंदर्भात योग्य त्या उपाययोजना अमलात येत नसल्याचे लक्षात येताच न्यायालयाने नाराजी व्यक्त करून राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले.

पालिका काहीच करीत नसेल, तर त्यांच्याविरोधात कारवाई करण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. याची जाणीवही न्यायालयाने करून दिली. राज्यभरातील रस्त्यांची परिस्थिती खराब आहे, यावर लक्ष ठेवण्यासाठी एखादी स्वतंत्र यंत्रणा उभारायला हवी, वाहतूक पोलिसांची मदत घ्या, असा सल्ला देताना उच्च न्यायालयाने या सगळ्या गोष्टींवर तुम्ही नेमक काय करणार आहात हे आम्हाला दोन दिवसात सांगा, असे बजावताना याचिकेची सुनावणी तहकूब ठेवली.

# माझ्या सहनशीलतेचा अंत बघू नका

## काहीही करा पण मला लवकर मंत्री करा

**मुंबई - माझ्या सहनशीलतेचा अंत बघू नका, काहीही करा पण मला लवकर मंत्री करा, असे साकडेच मंत्रिमंडळ प्रवेशाचा मुहूर्त लांबत चालल्याने हताश झालेल्या माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घातले.**



गेल्या सप्टेंबर महिन्यात काँग्रेस आणि आमदारकीचा राजीनामा दिलेल्या राणे यांना भाजपमध्ये प्रवेश देऊन मंत्री करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. पण भाजपकडून राणे यांची पदोपदी अडवणूक करण्यात आली आहे. भाजपमध्ये राणे यांना अधिकृतपणे प्रवेश देण्यात आला नाही. स्वतंत्र पक्ष स्थापन करून राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा देण्याची अट घालण्यात आली. त्यानुसार राणे यांनी महाराष्ट्र स्वाभिमानी पक्षाची स्थापना केली आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा जाहीर केला. विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीत राणे यांना उमेदवारी किंवा पाठिंबा देण्याचे भाजपने टाळले. शिवसेना नाराज होईल म्हणून राणे यांचा पत्ता कापण्यात आला. पुन्हा आमदारकी मिळविण्यासाठीही राणे यांना प्रतीक्षा करावी लागत आहे.

मंत्रिमंडळात समावेश करण्याचे राणे यांना आश्वासन देण्यात आले असले, तरी कोणत्या ना कोणत्या कारणाने मंत्रिमंडळ विस्तार लांबणीवर टाकण्यात येत आहे. शुक्रवारी पत्रकार परिषदेत राणे यांची नाराजी उफाळून आली. २०१८ सुरू झाले, मग तुमचा मंत्रिमंडळातील समावेश कधी, या प्रश्नावर राणे यांनी माझी सहनशीलता संपण्यापूर्वी निर्णय घ्यावा, असे उद्गार काढले.

# मुंबईत हुक्का पार्लर किती?; बीएमसी अनभिज्ञ

**मुंबई - कमला मिल परिसरातील मोजोस आिण वन अबव्ह या पबला आग लागून १४ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर पालिकेने हॉटेलांतील अवैध बांधकामांवर कारवाई सुरू केली. मात्र आगीला कारण ठरलेल्या हुक्कापार्लरविरोधात कुठल्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने शुक्रवारी पालिकेच्या विधी समितीत संताप व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे मुंबईत हुक्का पार्लर किती याची माहिती पालिकेकडे नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असून हुक्का पार्लरविरोधात कारवाई करण्यास पालिका कमी पडत असल्याने विधी समितीची बैठक तहकूब करण्यात आली.**

कमला मिल दुर्घटनेच्या अहवालात पबमधील हुक्का पार्लरमुळे आग लागल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मुंबईत ठिकठिकाणी हुक्का पार्लर सुरु आहेत. मात्र त्याविरोधात पालिकेचे आरोग्य अधिकारी कारवाई का करत नाही असा प्रश्न सदस्यांनी उपस्थित केला. कमला मिलसारख्या दुर्घटना रोखण्यासाठी आणि मुंबईकर नागरिकांच्या सुरक्षेसाठी पालिका प्रशासनाने हुक्का पार्लर विरोधात



भारतीय दंड संहितेच्या २८५ कालमान्वये गुन्हा नोंद करण्याची मागणी भाजपचे नगरसेवक अनिश मकवाणी यांनी केली. मुंबईतील हुक्का पार्लरबाबत आपण सहा महिन्यांपासून पालिकेकडे माहिती मागत आहोत. मात्र माहिती दडवून ठेवली जात असल्याचे भाजपचे अभिजीत सामंत यांनी सांगितले.

पालिकेकडे आरोग्य विभाग व अग्निशमन विभाग आहे. या विभागांच्या नियमांचा वापर करून हुक्का पार्लरवर कारवाई करण्याची मागणी सदस्यांनी केली. यावर हुक्का पार्लरवर पालिकेच्या अधिनियमाखाली कारवाई करणे शक्य नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट केल्याने संतापलेल्या सर्वपक्षीय सदस्यांनी सभा तहकुब करण्याची मागणी केली. सदस्यांच्या मागणीचा आणि संतप्त भावनांचा विचार करीत विधी समिती अध्यक्ष सुहास वाडकर यांनी सभा तहकूब केली.

# स्तनाचा कर्करोग झालेल्या महिलांवर मोफत उपचार करा

**मुंबई - स्तनाचा कर्करोग (ब्रेस्ट कॅन्सर) झालेल्या महिलांना सरकारी रुग्णालयात विनामुल्य उपचार केले जावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी लोकसभेत खासगी विधेयक मांडले आहे. सरकारी रुग्णालयात या रुग्णांवर मोफत उपचार करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.**



स्तनांचा कर्करोगाचा विळखा भारतात दिवसेंदिवस वाढत चालला आहे. याचे निदान वेळेत झाले तर रुग्णाला वाचवता येते. मात्र महिलांमध्ये याबाबत पुरेशी जनजागृती झालेली नसल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत. या आजाराने सन २०१२ मध्ये सुमारे ७० हजार महिलांचा मृत्यु झाला. २०२० पर्यंत या आजाराने मृत्यु पावणाऱ्यांची संख्या ७६ हजारावर पोहोचेल अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. सुप्रिया सुळेंनी सादर केलेल्या या विधेयकाला ब्रेस्ट कॅन्सर कायदा असे नाव दिले आहे. या विधेयकाच्या माध्यमातून सुप्रिया सुळेंनी स्तनाच्या कर्करोग झालेल्या महिलांना सरकारी रुग्णालयात मोफत उपचार मिळाले पाहिजेत अशी मागणी केली आहे.

स्तनाच्या कर्करोगाचे निदान करण्यासाठी तपासण्या मोफत उपलब्ध कराव्यात, हा कायदा सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांना लागू करावा, केंद्राने ब्रेस्ट कॅन्सरबाबत जनजागृती करावी, शहरी आणि ग्रामीण भागात ही सेवा असावी, सरकारी रुग्णालयांमध्ये ब्रेस्ट कॅन्सर पीडित महिलेला मोफत उपचार मिळावेत, हा कायदा झाल्यानंतर सरकारने योग्य आर्थिक तरतूद करावी अशा तरतुदी यामध्ये करण्यात आल्या आहेत.

# समृद्ध महाराष्ट्रात मुले मात्र कुपोषित

**मुंबई** - ३६% बालकांचे वजन कमी २०१५-१६ चा जो अहवाल तयार करण्यात आला आहे त्यानुसार राज्यात बुटकेपणाचे प्रमाण हे ३४.४ टक्क्याने वाढले आहे. तर लुकडेपणाचे प्रमाण हे २५.६ टक्क्यांनी वाढले आहे. त्याचबरोबर अतीतिव्र लुकडेपणातही ९.४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. कमी वजनाची मुले जन्माला येण्याचे प्रमाण हे थोडेथोडके नव्हे तर तब्बल ३६ टक्क्यांनी वाढले असून ते चिंता वाढविणारे आहे. प्रोटीन्सयुक्त आहाराची गरज कमी वजनाची बालके तसेच लुकडेपणा टाळायचा असेल तर प्रोटीन्सयुक्त आहाराची गरज असल्याचे आहारतज्ञ डॉ. फातिमा छत्रीवाला यांनी सांगितले. ही सगळी समस्या साधारणपणे कनिष्ठ मध्यमवगिऱ्य समाजातून दिसून येते. मूळ समस्या ही चौरस आहाराची आहे. तो आहार घेणे व गर्भधारणेच्या काळात आहाराची विशेष काळजी घेणे हाच यावरील उपाय असल्याचे त्या म्हणाल्या.

औद्योगिक व माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या व जगभरातून येणारी सर्वाधिक गुंतवणूक आकर्षित करणाऱ्या महाराष्ट्रात पाच वर्षाखालील बालके मात्र कुपोषितच आहेत. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेने हे वास्तव समोर आले आहे. या अहवालाने सातत्याने प्रगतीचा उंचावणारा आलेख मांडणाऱ्या



राज्यकर्त्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे तीन टप्प्यात देशभर केला जातो. त्यातून येणाऱ्या आकडेवारीचा उपयोग आरोग्य व कुटुंब कल्याणाच्या योजना देशभर राबविण्यासाठी केला जातो. मात्र याच अहवालातून जे वास्तव समोर आले आहे ते गंभीर व भावी पिढीसाठी विचार करायला लावणारे आहे. गेल्या काही वर्षात राज्यात या कुपोषणाच्या समस्येने लुकडेपणाचे प्रमाण वाढल्याचे वास्तव समोर आले आहे.

***महिलांमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण ४८ टक्के***

भावी पिढीला ज्यांनी जन्म द्यायचा त्या प्रजनन वयोगटातील महिला व किशोरवयीन मुलींमध्ये म्हणजे साधारणपणाने १५ ते ४९ वर्षे या वयोगटातील महिलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण हे २३.५ टक्के एवढे मोठे आहे. त्यामध्येही रक्तक्षयाचे प्रमाण हे ४८ टक्के एवढे भयावह असुन बालकांमधील कुपोषणाचे तेच मोठे कारण असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. केवळ ६ टक्के बालकांना चौरस आहार पाच वर्षाखालील अर्भक व बालकांच्या स्तनपान व त्यांना दिल्या जाणाऱ्या पूरक आहारातील त्रुटींवरही या अहवालात नेमके बोट ठेवण्यात आले आहे. ६ ते २३ महिने या वयोगटातील बालकांना पूरक आहाराची गरज असते मात्र केवळ ६.५ टक्के बालकांनाच चौरस आहार दिला जात असल्याचे आढळले आहे. ही पोषण स्थिती तातडीने बदलण्याची शिफारसही अहवालात करण्यात आली आहे.

# मुंबई, ठाण्यात रेशन दुकानांत मिळणार दूध

**मुंबई** - ठाणे व मुंबईमधील शिधावाटप दुकानदारांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांना या दुकानांमध्ये महानंदचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. राज्यातील शिधावाटप दुकानांमधून सध्या गहू आणि तांदूळ विक्री केली जात होते. कमिशनमधून मिळणाऱ्या उत्पन्नातून कर्मचाऱ्यांचे पगार, दुकानांचे भाडे, वीजबिल देणे दिवसेंदिवस अशक्य होऊ लागल्यामुळे त्यांनी शासनाकडे मागणी केल्यानंतर चणाडाळ, भाजीपाला, रवा, शेंगदाणे इत्यादी खुल्या बाजारातील वस्तूंची विक्री करण्यास परवानगी देण्यात आली होती.

मुंबई व ठाण्यातील जनतेला या सर्व वस्तू आपल्या परिसरात सहजासहजी उपलब्ध होतात. त्यामुळे शासनाच्या या आदेशाचा या दोन प्रमुख शहरातील



शिधावाटप दुकानदारांना विशेष लाभ होत नव्हता. या शहरातील दुकानदारांची मागणी तसेच महानंदा दुग्ध संस्थेलाही ग्राहक मिळावेत, या हेतूने मुंबई व ठाण्यातील शिधावाटप दुकानांमध्ये महानंदचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. महानंद दुग्धशाळेच्या अधिकृत वितरकांमार्फत रास्तभाव दुकानांपर्यंत हे पदार्थ वितरीत केले जाणार आहेत. हा व्यवहार दुग्धशाळा व संबंधित रास्तभाव दुकानदारांमध्ये राहील, असेही अन्न व नागरी पुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

# आदेशाविनाच थांबली मोनोरेलची धाव!



## प्रशासनाकडून केला जात फेब्रुवारीत मोनोरेल पुन्हा सुरू करण्याचा दावा

**मुंबई :** गेल्या दोन महिन्यांपासून बंद असलेली मोनोरेल बंद ठेवण्याचे कोणतेही आदेश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिलेले नसल्याची धक्कादायक माहिती आरटीआयमध्ये समोर आली आहे. मोनोला कोणत्या कारणाने आग लागली होती, या प्रश्नावरही अद्याप तपासणी सुरू असल्याचेच उत्तर एमएमआरडीएने दिले आहे. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून आगीचे कारण शोधण्यात प्रशासन निष्प्रभ ठरल्याचेच दिसत आहे.

आरटीआयमध्ये विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना एमएमआरडीए प्रशासनाने अनेक धक्कादायक बाबी उघड केल्या आहेत. त्यात आगीचे मुख्य कारणच समोर आलेले नसताना प्रशासनाकडून फेब्रुवारीत मोनोरेल पुन्हा सुरू करण्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे आगीचे कारण माहीत नसल्याने पुन्हा आग लागू नये, म्हणून काय खबरदारी घेणार, हे उत्तरही गुलदस्त्यातच आहे.

माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार, मोनोरेलमधून प्रशासनाला अंदाजे दररोज १ लाख २० हजार रुपयांची आवक असल्याचे सांगण्यात आले आहे. अशा प्रकारे ८ नोव्हेंबर २०१७पासून बंद असलेल्या मोनोमुळे आत्तापर्यंत प्रशासनाचे अंदाजित ८४ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. प्रशासनाचे शासकीय माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता (मोनोरेल) यांनी आरटीआय कार्यकर्ते शकील अहमद शेख यांस ही माहिती दिली आहे.

# नद्या प्रदूषित केल्यास होणार कडक कारवाई

मुंबई - मुंबई उपनगरातील मिठी नदीत टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे दरवर्षी पूर परिस्थिती निर्माण होते. शिवाय पर्यावरणाला धोका निर्माण होतो. अशा गोष्टी यापुढे खपवून घेतल्या जाणार नाहीत, असा इशारा पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी संबंधितांना दिला आहे. तसेच मिठी, पोयसर आणि ओशिवरा नदी प्रदूषित करणाऱ्यांवर नोटीसा पाठवून कडक कारवाई करण्याचे निर्देशही कदम यांनी शुक्रवारी दिले आहेत.

मंत्रालयात मिठी, पोयसर आणि ओशिवरा नदीतील प्रदूषणाबाबत आढावा बैठक झाली. यावेळी कदम यांनी अधिकाऱ्यांना वरील सूचना केल्या आहेत. मुंबई उपनगरातील नद्यांमध्ये काही कारखाने सांडपाणी सोडतात. कचरा आणि घाण टाकण्यात येते. शिवाय नदीकाठावर बेकायदा झोपड्या उभ्या करणाऱ्या व्यक्ती व संस्थांच्याविरोधात कडक कारवाई करण्यात यावी. तसेच अशांना नोटीसा द्याव्यात, असे निर्देश पर्यावरण मंत्र्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

# मुंबई क्राइम ब्रँचमध्ये नारळांची दहशत

**मुंबई** - मुंबई पोलिस आणि प्रामुख्याने क्राइम ब्रँचची अंडरवर्ल्डवर दहशत असल्याचे म्हटले जाते. पण, क्रॉफर्ड मार्केट येथील पोलिस मुख्यालयातील क्राइम ब्रँचच्या इमारतीजवळील माडाच्या झाडावरून टपाटप पडणाऱ्या नारळांची चांगलीच दहशत निर्माण झाली आहे. दररोज नारळ पडण्याचा सिलसिला सुरू असून शुक्रवारी सकाळी अर्धा डझन नारळ पडले. त्यात कपाळमोक्ष होताहोता दोन महिला कर्मचारी वाचल्याचेही सांगितले जाते.

क्रॉफर्ड मार्केट येथील मुंबई पोलिस मुख्यालयात क्राइम ब्रँचची दगडी इमारत आहे. ही इमारत अनेक गुन्हे उघडकीस आणण्यापासून वेगवेगळ्या नाट्यमय घटनांची साक्ष आहे. अंडरवर्ल्डच्या कारवायांवर नजर ठेवणाऱ्या इमारतीभोवती नारळांसह काही झाडे आहेत. त्यातील या दोन्ही नारळांच्या झाडांना भरपूर नारळ लागले आहेत.

नारळ वेळेत न काढल्याने जमिनीवर कोसळत असून त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. शुक्रवारी अशा नारळांच्या हल्ल्यांपासून दोन महिला कर्मचारी बालमबाल बचावल्या आहेत. अशा नारळांच्या पडझडीने सावध झालेले कर्मचारी, अधिकारी इथून जाताना जपून पावले टाकत आहेत. तिथले कर्मचारीही येजा करणाऱ्यांना सावध करत आहेत.



# राज्यात पाण्याचाही भडका!



## उद्योगांसाठी ५० टक्के तर शेती आणि पिण्यासाठी १७ टक्के दरवाढ

**मुंबई** - राज्यातील धरणांमधून शेती, पिण्याचे पाणी आणि औद्योगिक वापरासाठी पुरवण्यात येणाऱ्या पाण्याच्या दरात राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने वाढ केली असून शेती-पिण्याचे पाणी १७ टक्क्यांनी तर उद्योगांचे पाणी ५० टक्क्यांनी महाग झाले आहे. बाटलीबंद पाणी, शीतपेये व बीअर उत्पादनासाठी देण्यात येणाऱ्या पाण्याचा दर २५ पट वाढवत तो १६ रुपये प्रति एक हजार लिटरवरून थेट १२० रुपये करण्यात आला आहे. सर्वात महत्त्वाचे शेतीसाठी आता हेक्टरनिहाय सरसकट दर न आकारता मीटरने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

सध्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने २०१०-११ मध्ये निश्चित केलेल्या दरानुसार पाणी दिले जात होते. गेल्या सात वर्षात महागाई निर्देशांकात ६३ टक्के वाढ झाली आहे. सिंचन व्यवस्थापनाचा खर्च वाढत असल्याने पाण्याच्या दरात वाढ करण्यात आली असून नवीन दर एक फेब्रुवारी २०१८ पासून लागू होतील. नव्या दरातून १०१६ कोटी रुपये महसूल मिळेल.

ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या पाण्याचे प्रमाणही वाढवण्यात आले आहे. त्यांना प्रति माणशी प्रति दिन आता ४० ऐवजी ५५ लिटर पाणी मिळेल. क वर्ग, ब वर्ग, आणि अ वर्ग नगरपालिकांसाठी अनुक्रमे ७०, १०० व १२५ लिटर पाणी देण्यात येईल. ५० लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या शहरांना १३५ लिटर तर त्यारील लोकसंख्येच्या शहरांना १५० लिटर पाणी प्रति माणशी प्रति दिन मिळेल.घरगुती वापरासाठी महानगरपालिकांना २५ पैशांना हजार लिटर, नगरपालिकांना १८ पैसे व ग्रामपंचायतींना १५ पैशांना हजार लिटर पाणी मिळेल. त्याचबरोबर मर्यादेच्या ११५ ते १४० टक्के पाणी वापरल्यास दीडपट तर १४० टक्क्यांपेक्षा जास्त पाणी उचलल्यास दुप्पट दर द्यावा लागेल. उद्योगांना चार रुपये ८० पैशांना हजार लीटर पाणी मिळेल. त्यांनी मर्यादेपेक्षा जास्त पाणी वापरल्यास दीडपट दर लागेल.

शेतीसाठी खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी अनुक्रमे प्रति एक हजार लिटरसाठी साडेचार पैसे, नऊ पैसे, साडेतेरा पैसे इतका दर असेल. पाणीवापर संस्थांना या दरात २५ टक्के सूट देण्यात आली असून सूक्ष्म सिंचनासाठी आणखी २५ टक्के प्रोत्साहनात्मक सूट देण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रति हेक्टरी पाण्याचा सरसकट दर यापुढे असणार नाही. तर शेतीसाठी मीटरनेच पाणीपुरवठा केला जाईल. यापुढे उपसा सिंचन योजनेवरील शेतकऱ्यांना पाणीपट्टी व फक्त १९ टक्के वीजबिल द्यावे लागेल.

# संपादकीय...

## सेल्फीवेडाचं भूत कधी उतरणार?



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक



मोबाईल नसणारी व्यक्ती आज अपवाद म्हणूनही शोधावीच लागेल. बहुतेक सर्व कंपन्यांनी सेल्फी एक्स्पर्ट मोबाईल आणले आहेत. तरुणच काय, म्हाताऱ्या व्यक्तीही सेल्फी काढण्यात मागे राहात नाहीत. सेल्फी काढण्याच्या सवयीचे व्यसनात रूपांतर होऊन सेल्फायटिस नावाचा आजार निर्माण झाला आहे. ही नक्कीच बेचैन करणारी गोष्ट आहे. भारतीयांसाठी हा आजार आहे, याही पेक्षा महत्त्वाची आणि चिंतेची बाब आहे ती म्हणजे, सेल्फीच्या नादात होणारे सर्वाधिक मृत्यू आपल्या देशात होताना दिसतात. अलीकडेच पालघर येथील पारनाका येथे समुद्रात बोटीतून फिरण्यासाठी गेलेल्या ४० विद्यार्थ्यांपैकी तीन तरुणींचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली. बोटीवर असताना सेल्फी काढण्याच्या नादात बोट एका बाजूला कलंडली आणि तीन विद्यार्थिनींना जलसमाधी मिळाली. बोटीच्या टपावर जाऊन सेल्फी काढण्याचा मोह त्यांच्या जीवावर बेतला. अलीकडेच तामिळनाडूतील त्यागराज स्कूल ऑफ मॅनेजमेंट आणि लंडनमधील नॉटिंगहम ट्रेंट विद्यापीठ यांच्या संयुक्त अभ्यासातून काही निष्कर्ष समोर आले आहेत. दिवसभरात तीनहून अधिक वेळा सेल्फी काढणाऱ्या व्यक्तीला सेल्फायटिस नावाचा आजार जडलेला असू शकतो. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ मेंटल हेल्थ अँड ॲडिक्शन'मध्ये हे संशोधन प्रकाशित झाले आहे. त्यात म्हटल्याप्रमाणे सेल्फीशी निगडित या सेल्फायटिस डिसऑर्डरने ग्रस्त लोकांना आत्मविश्वास वाढवण्यासाठी, मनोवस्था चांगली ठेवण्यासाठी, आठवणी जपण्यासाठी, प्रचार करण्यासाठी किंवा एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी सतत सेल्फी काढायचा असतो. असे करणाऱ्या लोकांची ही सवय एखाद्या व्यसनी व्यक्तीसारखीच असते. सेल्फीविषयी याआधीही काही निरीक्षणे किंवा अहवाल आलेले आहेत आणि त्यावरून अनेक संकेत किंवा धोक्याची सूचनाही देण्यात आली आहे. सर्वात घातक गोष्ट म्हणजे, सेल्फीच्या नादात जाणारे जीव. गेल्या काही काळात अशा दुर्घटनांची संख्या खूप अधिक आहे. अनेकदा काळजी घेऊनही अपघात होतात. अगदी जीव गमावण्याची वेळही लोकांवर आलेली आहे. याच वर्षी दिल्लीतील इंद्रप्रस्थ इन्स्टिट्यूट आणि कार्नेड मेलन विश्वविद्यालय यांनी संयुक्तपणे 'मी, मायसेल्फ अँड मायकिल्फी' या नावाने एक अहवाल सादर केला होता. त्यात मार्च २०१४ ते सप्टेंबर २०१६ दरम्यान संपूर्ण जगातच सेल्फी घेताना बेसावधगिरीमुळे १२७ मृत्यू झाले होते. त्यात अर्ध्याहून अधिक मृत्यू हे एकट्या भारतात झाले होते. समुद्रकिनाऱ्यांवर उंच लाटांमध्ये, रेल्वे ट्रॅकजवळ रेल्वे जात असताना, एखाद्या इमारतीच्या छतावर, उंच डोंगराच्या खोली-दरीच्या टोकावर सेल्फी घेताना अनेक अपघात देशामध्ये झाले आहेत. मानसशास्त्रज्ञांच्या मते मोबाईल कॅमेऱ्यातून घेतली जाणारी सेल्फी ही व्यक्तीचा अहंकार प्रदर्शित करत असते. त्यामुळेच सेल्फीमुळे लोक आत्मकेंद्री होण्याच्या दिशेने प्रवास करीत आहेत. सेल्फीचा इतिहास अनेक दशकांपूर्वीचा आहे. १८३८ मध्ये अमेरिकेत फिलाडेल्फियामध्ये फोटोग्राफीची हौस असलेला औषध विक्रेता रॉबर्ट कॉर्नेलियसने आपला स्वतःचा फोटो कॅमेऱ्यात टिपला होता, असा दावा केला जात आहे. जगातील हा पहिली सेल्फी असल्याचे सांगितले जाते. गेल्या पाच वर्षात सेल्फीचे वेड जगभरात पसरले आहे. २०१३ हे वर्ष सेल्फीयुगाची सुरुवात मानली जाते. या एका वर्षभरातच लोकांनी कोट्यवधी सेल्फी घेतले. त्याच वर्षी जगभरात २३.८० कोटी सेल्फी काढून ते फेसबुकवर अपलोड केले. अशा गोष्टींचे निरीक्षण करणाऱ्या 'सिम्प्लीफाय ३६०' या संस्थेने हा आकडा सांगितला आहे. सामाजिक माधम्यांमध्ये हजारो आभासी मित्र असतानाही अनेकांकडे एक सच्चा मित्राची कमतरता असते. आभासी मित्रांना दाखवण्यासाठी अगदी खासगी वैयक्तिक गोष्टींही खुलेपणाने समाजमाध्यमांवर मांडत सुटतात. वेळ प्रसंग न पाहता आणि दुसऱ्या व्यक्तीला त्याचा त्रास होईल का, याचाही विचार यामध्ये केला जात नाही. सेल्फीच्या रूपाने दिखाऊपणा आणि आत्मप्रौढी मिरवण्याची प्रवृत्ती समाजात वाढते आहे. आपण दुसऱ्यांपेक्षा श्रेष्ठ आहोत, ही भावना काही काळ सुखावेल; पण त्यानंतर मात्र त्याचे वाईट परिणाम होताना दिसून येतात. मग सेल्फी ही एक सामाजिक समस्या आणि आजार या रूपांत पाहायला मिळते. या सर्व परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाला आणि समाजाला सेल्फीविषयी काही आचारसंहिता तयार करता येईल का किंवा तसा विचार करता येईल का? कधी, कुठे आणि कोणत्या वेळप्रसंगी, जागेवर सेल्फी घ्यावी, याविषयी लोकांना सूचना करणे आणि सेल्फी घेताना काय काळजी घ्यावी, याविषयी लोकांना सावाधगिरीची सूचना देता येईल का, याचाही विचार केला पाहिजे.

# भयावह 'असर'




**शिक्षणाचा रोजच्या जगण्यात किती उपयोग होतो, असा प्रश्न आजवरच्या अनेक पिढ्यांनी विचारला. धडे आणि प्रश्नोत्तरे पाठ करून गुणांची चळत लागलेल्यांनाही नंतरच्या आयुष्यात असेच भरघोस यश मिळत नाही, हीच तर आजवरची तक्रार होती. परिसरज्ञान आणि व्यवहारज्ञान यांची सांगड आयुष्यातील अनुभवच देऊ शकतात, असाही सिद्धान्त वेळोवेळी मांडण्यात आला. देशाने दशकभरापूर्वीच घोकंपट्टीच्या शिक्षणाला रामराम करीत शिक्षणाची नवी पद्धत अमलात आणली. मात्र त्याचा परिणाम म्हणावा तेवढा झालेला दिसत नाही. विशेषतः ग्रामीण भारतातील शिक्षणाचा दर्जा गेल्या अनेक वर्षांच्या तथाकथित प्रयत्नानंतरही फारसा सुधारत नसल्याचे यंदाचा प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचा असर अहवाल सांगतो. दरवर्षी ६ ते १४ वयोगटांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासणाऱ्या प्रथम फाऊंडेशनने या वेळी १४ ते १८ हा वयोगट निवडला. याचा अर्थ यापूर्वीच्या चाचण्यांमध्ये समाविष्ट झालेलेच विद्यार्थी पुन्हा चाचणीमध्ये समाविष्ट झाले. त्यांच्यामध्ये कोणताच गुणात्मक फरक पडलेला दिसत नसून, शिक्षणाचा दर्जा ग्रामीण भागात सुधारूच शकत नसल्याचे अनुमान यावरून काढता येते. शिक्षणाचा प्रसार ज्या वेगाने होतो आहे, त्याच वेगाने त्याचा दर्जा वाढत नाही, उलट काही वेळा तो कमी होताना दिसतो. हे चित्र आधुनिक भारताची झोप उडवणारे आहे. सरकारी बाबू आणि राजकीय पुढारी यांना त्याच्याशी फारसे सोयरसुतक असेल वा नसेल. त्याचा गांभीर्याने विचार सर्वांनीच करायला हवा.**

शिक्षणाचे स्वरूप काळानुसार बदलत गेलेले आहेच. ते अधिकाधिक वास्तवाभिमुख होणे अपेक्षितच आहे. पाऊणकी आणि औटकीचे पाढे घोकण्यात लहानपण घालवलेल्या मागील पिढ्यांना त्या पाढ्यांचा आयुष्याच्या व्यवहारात कधीच उपयोग करावा लागला नाही. शाळेतल्या प्रयोगशाळेतील प्रयोगांचे साहित्य आणि कृती घेऊन नंतर कधीच नवे प्रयोग करण्याची वेळ त्यांच्यावर आली नाही. जगण्याचे व्यवहार फार वेगळे असतात. त्यामध्ये गणिती पद्धत असतेच असे नाही. कार्यकारणभाव आणि त्याचे मूळ शोधण्यात आवश्यक असलेली सर्जनशीलताच त्या व्यक्तीला घडवत असते. याचे ज्ञान शिक्षणातून कसे मिळू शकेल, याचा विचार झाल्यानंतर ज्ञानरचनावादी पद्धत अमलात आणण्याचा निर्णय देशपातळीवर घेण्यात आला. आज तेरा वर्षांनंतरही या नव्या पद्धतीची फळे फारशी गोड नाहीत, हे असरच्या अहवालावरून स्पष्ट होते. शिक्षणाचा संबंध नोकरी मिळवण्याशी म्हणजे पैसे मिळवण्याशी जोडला जाणे स्वाभाविकच. कोणती कौशल्ये आत्मसात केल्यानंतर किमान पैसे मिळवण्याची पात्रता निर्माण होते, याचा विचार नव्या पद्धतीशी निगडित होता. शिक्षणाचे सरकारीकरण होत असतानाच्या गेल्या काही दशकांत खासगीकरणाला प्राधान्य देतानाही, निर्णयाच्या दोऱ्या आपल्याच हाती राहतील, याची काळजी राजकीय आणि प्रशासकीय वर्गाने घेतली. त्यामुळे शहरांमधील खासगी संस्थांमध्ये उत्तम शिक्षण मिळण्याची व्यवस्था निर्माण झाली. अधिक पैसे मोजून अधिक चांगले शिक्षण मिळते, असा समज त्यामुळे दृढ झाला. शहरांच्या बरोबरीने ग्रामीण भागातील शिक्षणाच्या दुःस्थितीबद्दल मात्र कुणालाही चकार शब्द काढण्याची गरज वाटली नाही. त्यामुळे शिक्षणाच्या बाजारात शहरी आणि ग्रामीण यामधील दरी प्रचंड प्रमाणात वाढत गेली. महाराष्ट्रात नागरीकरणाचा वेग वाढला म्हणून तेथील शिक्षणाचा दर्जा सुधारला, असेही घडले नाही.

असरच्या पाहणीत इयत्ता आठवी ते बारावीच्या अनेक मुलामुलींना आपापल्या राज्याची आणि देशाची राजधानी सांगता आली नाही. या अहवालावरून असे दिसते, की ५७ टक्के विद्यार्थ्यांना साधा भागाकारही येत नाही, ५८ टक्क्यांना राज्याचा नकाशाही वाचता येत नाही आणि ४० टक्के मुलांना इंग्रजीतील एक वाक्यही वाचता येत नाही. असरचा हा अहवाल देशपातळीवर ग्रामीण भागातच घेण्यात आला आणि त्यासाठी २४ राज्यांतील २८ जिल्हे निवडण्यात आले आणि तेथील सुमारे तीस हजार मुलांच्या चाचण्या घेण्यात आल्या. देशाच्या आकारमानात हे प्रमाण नगण्य आहे, असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता येऊ शकते. मात्र टक्केवारीच्या भाषेत ही परिस्थिती थोड्याफार फरकाने देशभर तशीच असणार, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

हे सगळे विद्यार्थी रचनावादी शिक्षणास सुरुवात झाल्यानंतर शिक्षणात आलेले आहेत. त्यामुळे या नव्या शिक्षणपद्धतीचा परिणाम नेमका कसा होतो आहे, हे या अहवालातून स्पष्ट होते. महाराष्ट्रातील सातारा आणि अहमदनगर या दोन जिल्ह्यांतील बराचसा भाग आर्थिकदृष्ट्या संपन्न आहे. साखरपट्ट्यातील या जिल्ह्यांमध्ये होणारी आर्थिक उलाढाल आणि तेथील राजकारण यांचा शैक्षणिक वातावरणाशी संबंध कसा प्रस्थापित होतो, याचे निदर्शक म्हणून या जिल्ह्यांकडे पाहता येईल. याच दोन जिल्ह्यांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेची पाळेमुळे रोवली गेली. ग्रामीण भागातील शिक्षणाची ही चळवळ त्या काळात किती महत्त्वाची आणि उपयुक्त होती, हे 'रयत'ने सिद्ध केले. ही चळवळ अपवादासारखी आजही सुरू आहे. मात्र बदलत्या अर्थकारणाने आणि समाजकारणाने पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षणाचा साचाही बदलत गेला. सातारा आणि नगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या पाहणीचे परिणाम राज्यातील अन्य ग्रामीण भागातही थोड्याफार फरकाने तसेच सिद्ध होतील, असे म्हणण्यासारखी आजची स्थिती आहे. महाराष्ट्राने शिक्षणाच्या क्षेत्रात केलेली प्रगती केवळ शहरांपुरतीच सीमित आहे आणि तिचाच डांगोरा पिटला जातो, हेही या अहवालावरून लक्षात येते. शहरे आणि नगरे यातील शैक्षणिक सुविधांबाबतची परिस्थिती निदान स्वातंत्र्यानंतर तरी बदलायला हवी होती. परंतु तसे झाले नाही. उलट ग्रामीण भागातील शाळाच बंद करण्याचा निर्णय विविध कारणे देऊन सरकारकडून घेतला जात आहे.

# पालिकेच्या स्वच्छता ॲपवर तक्रारींचा पाऊस



**ठाणे - देशभरातील शहरांमधील यंदाच्या स्वच्छता सर्वेक्षणासाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या 'स्वच्छता ॲप' वर ४२ हजारांहून अधिक ठाणेकरांनी आतापर्यंत नोंदणी केली असून २८ हजार ५०२ तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. या ॲपवरील तक्रारींचा तात्काळ निपटारा केल्याचा पालिकेचा दावा असून त्याबद्दल ठाणेकरांनी समाधान व्यक्त केले आहे. केंद्र शासनाकडून ॲपवर दिल्या जाणाऱ्या गुणांकनामुळे देशभरातील प्रगतशील शहरांच्या यादीत ठाणे शहर १८ व्या क्रमांकावर आले आहे.**

केंद्र शासनाकडून दरवर्षी देशभरातील स्वच्छ शहरांची यादी जाहीर करण्यात येते. गेल्यावर्षी पहिल्या १०० स्वच्छ शहरांतही ठाण्याला स्थान मिळाले नव्हते. स्वच्छतेच्या यादीत शहराची घसरण झाल्याने महापालिकेवर टीका झाली होती. या पार्श्वभूमीवर यंदाच्या स्वच्छता यादीमध्ये देशभरातील शहरांमध्ये पहिला क्रमांक पटकाविण्यासाठी पालिकेने प्रयत्न सुरू केले आहेत. त्यासाठी शहरामध्ये विविध कार्यक्रम राबविण्यात येत असून त्यातून स्वच्छतेचा संदेश दिला जात आहे. शहरामध्ये मोठे फलकही लावण्यात आले आहेत. स्वच्छता सर्वेक्षण अभियानामध्ये नागरिकांनाही सहभागी होता यावे यासाठी केंद्र शासनाने स्वच्छता ॲप सुरू केले आहे. या ॲपवर नागरिकांना शहरातील स्वच्छतेसंबंधी तक्रारी करण्याची सुविधा देण्यात आली आहे. ॲपवर नोंदविलेल्या तक्रारीबाबत प्रतिक्रिया नोंदविण्याची सुविधाही आहे.

ॲपवर होणारी नागरिकांची नोंदणी, दाखल होणाऱ्या तक्रारींचा निपटारा आणि तक्रारीवरील कारवाईसंबंधी नागरिकांनी नोंदविलेली प्रतिक्रिया या आधारे गुणांकन देण्यात येते. या गुणांकनानुसार देशातील शहरांमध्ये ठाणे शहर १८ व्या स्थानावर आहे. २० डिसेंबर रोजी गुणांकनानुसार शहर २७ व्या क्रमांकावर होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. स्वच्छता ॲपवर नोंदणी केलेल्या ४२ हजार ७५१ नागरिकांपैकी ९ हजार ४६० नागरिक ॲपचा सातत्याने वापर करत आहेत. तर उर्वरित ३३ हजार २९१ नागरिक ॲपवर फारसे कार्यरत नाहीत. ॲपवरील तक्रारींवर केलेल्या कारवाईसंबंधी ६ हजार ७७० नागरिकांनी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. त्यापैकी ६ हजार १९८ म्हणजेच ९१ टक्के नागरिकांनी कारवाईबाबत समाधान व्यक्त केले. १४८ नागरिकांनी तटस्थ प्रतिक्रिया नोंदविली आहे तर ४२४ जणांनी मात्र कारवाईबाबत असमाधान व्यक्त केले.

*२६ हजार तक्रारी निकाली*

केंद्र शासनाच्या स्वच्छता ॲपवर ठाणे शहरातील ४२ हजार ७५१ नागरिकांनी नोंदणी केली आहे. जानेवारीअखेपर्यंत शहराला ४० हजार नोंदणीचे लक्ष्य देण्यात आले होते. मात्र, मुदतीपूर्वीच पालिकेने हे उद्दिष्ट पार केले आहे. या ॲपवर शहरातील नागरिकांनी स्वच्छतेसंबंधी आतापर्यंत २८ हजार ५०२ तक्रारी नोंदविल्या असून त्यापैकी २६ हजार ५५६ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरित एक हजार ९४१ तक्रारी स्वच्छतेसंबंधी नसल्यामुळे त्या नाकारण्यात आल्या आहेत.

# कळवा, मुंब्र्यात मेट्रोला लाल बावटा

**ठाणे** - ठाणे मेट्रोचा विस्तार गायमुखपर्यंत करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दाखविताच पालिकेने शहरातील अंतर्गत भागांत मेट्रोच्या आखणीसाठी हालचाली सुरू केल्या असल्या तरी या प्रकल्पाच्या सुसाध्यता अहवालातून तूर्तास कळवा-मुंब्रा आणि दिवा परिसराला वगळण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

ठाणे शहराच्या तुलनेत कळवा, मुंब्रा आणि दिवा या शहरांना रेल्वे मार्ग जवळ असल्याने अंतर्गत मेट्रो मार्गाचे जाळे विणताना मूळ ठाणे शहराचा प्रामुख्याने विचार व्हावा, अशा सूचना आयुक्त संजीव जयस्वाल यांनी दिल्या आहेत. त्यामुळे अंतर्गत मेट्रो मार्गाचा खर्च कमी होईल तसेच खासगी भागीदार शोधताना हा प्रकल्प अधिक व्यवहार्य होईल, अशी भूमिका असल्याचे सांगण्यात येते.

ठाणे महापालिकेच्या मूळ विकास आराखड्यात अंतर्गत वाहतुकीच्या विविध प्रकल्पांसाठी मार्गाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. हा मार्ग नेमका कोणता असावा, याचा निर्णय घेण्याचे अधिकार पालिकेस असले तरी तो कोठून जाईल याविषयी विकास आराखड्यात बरीच स्पष्टता ठेवण्यात आली आहे. पालिका हद्दीतील शहरांची लोकसंख्या २२ लाखांच्या घरात पोहचली आहे. १२ लाखांहून अधिक नागरिक ठाणे, घोडबंदर भागात राहतात. त्यांच्यासाठी ठाणे रेल्वे स्थानक हा एकमेव पर्याय आहे. मूळ ठाणे शहर, वागळे इस्टेट, वर्तकनगर, वसंत विहार, लोकपुरम आणि घोडबंदर मार्गावरील गृहसंकुलांमधील रहिवाशांना रेल्वेने प्रवासासाठी केवळ ठाणे स्थानकाचा पर्याय आहे. त्यामुळे मध्य रेल्वे, पालिका आणि मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने नवीन ठाणे स्थानकाच्या उभारणीची आखणी सुरू केली आहे. नव्या स्थानकाची उभारणी झाली तरीही शहरासाठी अंतर्गत वाहतूक व्यवस्थेची उभारणी करावी लागेल, असे नियोजनकर्त्यांचे मत आहे. शहराच्या अंतर्गत भागात मेट्रो प्रकल्प उभारण्याच्या हालचालींना वेग आला आहे. यासंबंधी नेमण्यात आलेल्या संस्थेकडून लवकरच सुसाध्यता अहवाल प्राप्त होणार आहे.



# रेल्वेतील मद्यतस्करीला सरकारी अनास्थेचे बळ



**ठाणे** - आयात शुल्क चुकवून रेल्वेतून आणला जाणारा उंची परदेशी मद्याचा अवैध साठा ठाण्याच्या उत्पादन शुल्क विभागाने हस्तगत केला असला, तरी मद्य तस्करी रोखण्यासाठी रेल्वे प्रशासन आणि उत्पादन शुल्क विभागाकडे ठोस यंत्रणाच नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मद्य तस्करी रोखण्यासाठी रेल्वे प्रशासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे, असे उत्पादन शुल्क विभागाचे म्हणणे आहे, तर संशयित सामानाची तपासणी करण्याचे काम रेल्वे सुरक्षा विभाग करतच असतो, असा रेल्वे पोलीस सुरक्षा दलाचा दावा आहे.

आयात शुल्क चुकवून रेल्वेतून दिल्लीहून मुंबईत विक्रीसाठी आणलेले तब्बल दोन कोटी रुपयांचे उंची मद्य उत्पादन शुल्क विभागाने अंधेरीतून जप्त केले. त्यामुळे रेल्वे पोलीस तसेच उत्पादन शुल्क विभागाच्या तपास यंत्रणेपुढे प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उपायुक्त तानाजी साळुंखे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी गोवा, कोकणातून येणाऱ्या रेल्वे गाड्यांची पनवेल येथे तपासणी केली जात असल्याचे सांगितले. छापादेखील टाकण्यात येतात, असेही ते म्हणाले.

# बेकायदा पार्किंगला ऊत

## रेल्वे बोर्ड सदस्यांच्या सूचनेनंतरही बदलापुरात परिस्थिती जैसे थे

**बदलापूर - बदलापूर रेल्वे स्थानकातील प्रश्न आणि प्रवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी रेल्वे बोर्डाच्या सदस्यांनी डिसेंबर महिन्यात स्थानकात भेट देऊ न विविध मुद्द्यांवरून स्थानक प्रशासनाची खरडपट्टी काढली होती. या घटनेला महिना उलटूनही स्थानकातील अनेक समस्या जैसे थे असून स्थानक परिसरातील बेकायदा पार्किंगही सुरू असल्याचे समोर आले आहे.**

एल्फिन्स्टन येथील चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर विविध रेल्वे स्थानकातील समस्या जाणून घेण्यासाठी रेल्वे बोर्डाच्या सदस्यांनी स्थानकांची पाहणी केली होती. त्यात बदलापूर रेल्वे स्थानकाची पाहणी करण्यासाठी रेल्वे बोर्डाच्या तीनसदस्यीय समितीने डिसेंबर महिन्यात हजेरी लावली होती. या वेळी प्राथमिक सोयीसुविधा, स्थानक परिसरातील स्वच्छता, जाहिराती, पादचारी पूल, स्थानक परिसरातील अस्वच्छता, बेकायदा पार्किंग अशा विविध मुद्द्यांवरून बोर्डाच्या सदस्यांनी स्थानक प्रशासन आणि रेल्वे पोलिसांचे कान पिळले होते. स्थानकाच्या पूर्वेत असलेल्या रेल्वेच्या जागेत बेकायदा पद्धतीने दुचाकी पार्किंग होत असल्याची बाब या वेळी समोर आली होती. तसेच या ठिकाणी रेल्वेचे साहित्य बेवारसपणे पडल्याचेही दिसले होते. त्यावर बोट ठेवत बोर्डाच्या सदस्यांनी रेल्वे पोलिसांना धारेवर धरले होते. रेल्वे पोलीस अपघाताला आमंत्रण देत आहेत, असा आरोपही या वेळी सदस्यांनी केला होता. त्यामुळे ३१ डिसेंबरपूर्वी या सर्व गोष्टी थांबल्या पाहिजेत, असा सज्जड दम सदस्यांनी दिला होता. त्यामुळे यावर कारवाई केली जाईल अशी आशा होती. मात्र त्यानंतरही स्थानकाच्या शेजारील परिसरातील स्वच्छता, बेकायदा पार्किंगही जशास तसेच असल्याचे समोर आले आहे. आजही पहाटेच्या वेळी अनेक चाकरमानी येथे आपल्या दुचाकी पार्क करून जात असतात, तर रेल्वेच्या जागेतील कचराही तसाच आहे. त्यामुळे रेल्वे बोर्ड सदस्यांच्या सल्ल्यालाही रेल्वे पोलीस आणि स्थानक प्रशासनाने केराची टोपली दाखवल्याचे समोर आले आहे.



# भिवंडी, कळव्यात अनधिकृत बांधकामांवर कारवाई

## २३ गोदामे, १२५ झोपड्यांवर हातोडा



**ठाणे** - भिवंडी येथील कशेळी भागातील शासकीय जमिनींवर बेकायदा उभारण्यात आलेली २३ गोदामे शुक्रवारी महसूल विभागाने जमीनदोस्त केली. ठाणे येथील कळवा भागातील ७२ एकर भूखंडावर उभारण्यात आलेल्या १२५ झोपड्यांवरही पालिकेच्या पथकाने कारवाई केली.

भिवंडी येथील कशेळी भागातील सव्हे क्रमांक १९३ या शासकीय जमिनीवर बेकायदा बांधकामे करण्यात आल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे आल्या होत्या. जिल्हा प्रशासनाने काही महिन्यांपूर्वी या बांधकामांची पाहाणी केली होती. त्यामध्ये शासकीय जमिनीवर सहा गोदामे बेकायदा उभारण्यात आल्याचे, तर १७ गोदामांची बांधकामे अंशतः शासकीय जमिनीवर असल्याचे समोर आले होते. ही जमीन खाडीकिनाऱ्यापासून जवळ असल्यामुळे या बांधकामांसाठी खाडीकिनारी भराव टाकण्यात आल्याचे पाहाणीतून उघड झाले होते. ठाण्याचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी या बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश महसूल विभागाला दिले होते. त्यानंतर महसूल विभागाने संबंधित मालकांना आठ दिवसांपूर्वी नोटिसा बजावल्या आणि त्यानंतर शुक्रवारपासून भिवंडीचे प्रांताधिकारी संतोष थिटे आणि तहसीलदार शशिकांत गायकवाड यांच्या पथकाने कारवाई सुरू केली.

# अमेरिकेवर शटडाऊनची वेळ, हजारो कर्मचारी घरी बसणार

**वॉशिंग्टन-** अमेरिकेसारख्या बलाढ्य देशावर आर्थिक संकट ओढावलं आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारवर शटडाऊनची वेळ आली आहे. परिणामी ८० हजार कर्मचाऱ्यांवर घरी बसण्याची वेळ येणार आहे. डोनाल्ड ट्रम्प सरकारच्या वर्षपूर्तीची वेळ जवळ आलेली असताना त्यांना या जागतिक नामुष्कीला सामोरं जावं लागत आहे. हे शटडाऊन झाल्यामुळे अमेरिकेतील अनेक सरकारी विभाग बंद पडणार आहेत. हजारो कर्मचाऱ्यांना विनामोबदला (विदाऊट पे) सक्तीच्या रजेवर पाठवलं जाणार आहे.

अमेरिकेत अँटी डेफिशियन्सी ॲक्ट लागू आहे. त्यामुळे निधीची कमतरता असल्यास सरकारी यंत्रणांना त्यांचं कामकाज थांबवावं लागतं. निधीतील तूट भरुन काढण्यासाठी सरकारतर्फे 'स्टॉप गॅप बिल' आणलं जातं. हे डील अमेरिकन सरकारच्या प्रतिनिधी मंडळाने आणि सिनेट सदस्यांनी मंजूर करावं लागतं. सिनेट सदस्य याबाबत चर्चा करत असतानाच रात्रीचे बारा वाजले आणि त्यामुळे या विधेयकाला मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे अमेरिकेवर शटडाऊनची वेळ आली. यापूर्वी बराक ओबामा राष्ट्राध्यक्ष असताना २०१३ मध्येही दोन आठवडे सरकारी कामकाज पूर्णपणे बंद होतं. त्यामुळे ८ लाख कर्मचाऱ्यांना घरी बसावं लागलं.




# जम्मू कश्मीरमध्ये हाय अलर्ट, ५०० शाळा बंद

**श्रीनगर- जम्मू-कश्मीरमध्ये पाकिस्तानकडून सातत्याने शस्त्रसंधीचे उल्लंघन करण्यात येत असून जवान व नागरी वस्त्यांना लक्ष्य केलं जात आहे. शनिवारी व रविवारी झालेल्या चकमकीत चार जवान शहीद झाले असून तीन सामान्य नागरिक ठार झाले आहेत.**

यामुळे पाकड्यांच्या गोळीबारात जानेवारी २०१८ मध्ये मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ११ झाली आहे. हा आकडा २०१७ मध्ये संपूर्ण वर्षात पाकिस्तानच्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्यांच्या संख्ये इतका असल्याने जम्मू कश्मीर पोलिसांनी याची गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर जम्मू-कश्मीरमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला असून ५०० शाळा बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळील गावेही रिकामी करण्यात आली आहेत. सीमारेषेजवळील पाच जिल्ह्यातील डॉक्टर व पॅरामेडिकलच्या कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. कठुआतील परगाल येथील आंतरराष्ट्रीय सीमेवरील गावात २० हजार नागरिकांचे वास्तव्य आहे. या नागरिकांना बुलेटप्रुफ बंकर्समध्ये हलवण्यात आले आहे. तसेच सीमेपासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या ५०० शाळा बंद ठेवण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले आहेत.



# शिवसेनेला खूश करण्याचा मुख्यमंत्र्यांचा प्रयत्न?



**मुंबई- स्वतंत्र इमारती नसलेल्या राज्यातील ग्रामपंचायतींसाठी इमारत बांधण्याच्या योजनेला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यामागे भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गणित काय असावे, याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. खेड्यापाड्यांमध्ये बाळासाहेबांच्या नावाने इमारती उभ्या राहणार असल्याने त्याचा शिवसेनेला राजकीय फायदा होऊ शकतो. भाजप आणि शिवसेनेतील संबंध गेल्या वर्षी महानगरपालिका निवडणुकांपासून कमालीचे ताणले गेले आहेत. शिवसेनेने तर तुटेपर्यंत ताणले होते. युती करून शिवसेनेची २५ वर्षे कुजली व यापुढे युती नाही, असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले होते.**

शिवसेनेवर राजकीय कुरघोडी करण्याची एकही संधी भाजप सोडत नाही. तरीही अलीकडे भाजपने शिवसेनेबाबत धोरण थोडेसे नरमाईचे घेतल्याचे बोलले जाते.

दोनच दिवसांपूर्वी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वतंत्र इमारती नसलेल्या राज्यातील ग्रामपंचायतींना स्वत:ची इमारत उभारण्याकरिता शासनाकडून आर्थिक मदत दिली जाणार आहे. एकूण खर्चाच्या ९० टक्के अनुदान शासनाकडून मिळणार आहे. या योजनेनुसार एक हजारांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये १२ लाख, तर एक ते दोन हजारांपर्यंत लोकसंख्या असलेल्या गावांना १८ लाख रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेचे नामकरण बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना असे करण्यात आले आहे. पुढील चार वर्षांत ही योजना राबविण्यात येणार असून त्यासाठी ४४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यंदाच्या वर्षी पुढील दोन महिन्यांत २५ कोटी रुपये दिले जाणार आहेत. या योजनेचा पाच हजारांपेक्षा जास्त ग्रामपंचायतींना लाभ होऊ शकतो.

शिवसेनेकडे असलेल्या खात्यांच्या योजनांमध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या नावे योजना सुरू करण्याचा आग्रह धरला जातो; पण ग्रामविकास हे खाते भाजपच्या पंकजा मुंडे यांच्याकडे आहे. तरीही बाळासाहेबांचे नाव देण्यात आल्याने मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला का बरे खूश केले असावे याचे वेगवेगळे तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्र येण्याची शक्यता आहे. दोन्ही काँग्रेसने याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. भाजप, शिवसेना आणि काँग्रेस व राष्ट्रवादी एकत्र अशी तिरंगी लढत झाल्यास भाजपपुढे आव्हान उभे राहू शकेल. शेतकरी व विशेषत: ग्रामीण भागात भाजपबद्दल तेवढी आपुलकी राहिलेली नाही हे गुजरातच्या निकालावरून स्पष्ट झाले. अशा वेळी शिवसेनेची एकदम नाराजी नको, अशी मुख्यमंत्र्यांची खेळी असू शकते.

# नागपुरातील ५० तरुण इंग्लंडमधून बेपत्ता

**नागपूर-** बनावट पासपोर्ट व व्हिसा तयार करून इंग्लंडमध्ये गेलेले नागपुरातील ५०हून अधिक तरुण अचानक बेपत्ता झाले आहेत. या संदर्भात ब्रिटिश उपउच्चायुक्त कार्यालयाने नागपूर पोलिसांना कळवले असून आता या प्रकरणाचा तपास सुरू आहे. हे सर्व तरुण मुस्लीम असून त्यांना पाठवणारी दाम्पत्यसुद्धा मुस्लीम आहेत. त्यामुळे या बेपत्ता तरुणांचा वापर मानवी तस्करी किंवा दहशतवादी संघटनांमध्ये काम करण्यासाठी झाला असण्याची शंका घेतली जात आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांत व्यवसाय व उद्योग करण्याच्या निमित्ताने नागपूरहून अनेक तरुण इंग्लंडमध्ये गेले. मात्र तेथून ते परतले नाहीत. त्यांच्या व्हिसाची मुदत संपल्यानंतर ब्रिटिश सरकारने त्यांचा शोध घेतला असता ते तेथे सापडले नाहीत. त्या सर्व मुलांचे पासपोर्ट नागपुरातील पारपत्र कार्यालयातून तयार करण्यात आले होते. त्यामुळे सप्टेंबर २०१७ मध्ये मुंबईतील ब्रिटिश उपउच्चायुक्त कार्यालयाने नागपूर पोलीस आयुक्तांना पत्र लिहून या प्रकरणाची चौकशी करा, अशी विनंती केली. त्यानुसार पोलीस आयुक्तांनी प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे साहाय्यक पोलीस आयुक्त सोमनाथ वाघचौरे यांच्याकडे सोपवला. त्यांनी आयुक्तांना अहवाल सादर केला आहे.

या शहरातील आठ दाम्पत्यांनी त्यांचीच मुले असल्याचे भासवून व बनावट दस्तऐवज तयार करून काही तरुणांचे बनावट पासपोर्ट व व्हिसा तयार केले. त्यानंतर या तरुणांना इंग्लंडला पाठवण्यात आले.

पण ते भारतात परतलेच नाहीत. या तरुणांच्या जन्मतारखांची तपासणी केली असता त्यांना इंग्लंडमध्ये पाठवणाऱ्या दाम्पत्यांना केवळ तीन महिन्यांच्या अंतराने मुले झाल्याचे दिसून आले आहे.

## सेनेच्या वाघाची शेळी, शेळीचा ससा, आणि सशाचं कासव झालं- अजित पवार

**नांदेड-** राष्ट्रवादीचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नांदेडमधल्या हल्लाबोल यात्रेतल्या सभेत बोलताना शिवसेनेवर बोचरी टीका केलीय. ते म्हणाले, बाळासाहेबांच्या काळात



शिवसेना हा पक्ष वाघासारखा होता. मात्र त्या वाघाची नंतर शेळी झाली. मग शेळीचा ससा झाला आणि त्यानंतर शेळीचं कासव झालं. अशा शब्दांमध्ये अजित पवार शिवसेनेवर बरसले. शिवसेना सत्तेसाठी लाचार आहे, अशी टीकाही पवारांनी केलीय.राष्ट्रवादीच्या हल्लाबोल यात्रेत धनंजय मुंडेही होते. त्यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली. ते म्हणाले, 'मी मुख्यमंत्री बोलतोय या कार्यक्रमावर १ लाख रुपये खर्च होतो आणि मुख्यमंत्र्यांच्या मेकअपवर आणि लाईटवर २६ लाख रुपये खर्च होतो.' राष्ट्रवादीच्या हल्लाबोल आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्याला उस्मानाबादमधून सुरूवात झाली. या आंदोलनात राष्ट्रवादीचे दिग्गज नेते सहभागी झाले आहेत. तर समारोप औरंगाबादमध्ये होणार आहे. समारोपाच्या सभेला शरद पवार उपस्थित राहणार आहेत. तर २२ फेब्रुवारीपासून हल्लाबोल आंदोलनाचा तिसरा टप्पा उत्तर महाराष्ट्रातून सुरू होणार आहे.

# नातेवाइकांना कैद्यांच्या भेटीसाठी अपॉइंटमेंट घ्यावी लागणार

**मुंबई-** कैद्यांना भेटण्यासाठी मुलाखत कक्षात नातेवाइकांची होणारी गर्दी रोखण्याकरिता तुरुंग प्रशासनाने नवा पर्याय शोधून काढला आहे. नातेवाइकांनी टोल फ्री क्रमांकावर फोन केल्यावर त्यांना आता अपॉइंटमेंट दिली जाईल आणि त्यानुसार गर्दी टाळून कैद्यांची भेट घेता येणार आहे.



राज्यातील तुरुंगांमध्ये प्रथमच असा उपक्रम राबवला जात आहे. यासाठी ऑर्थर रोड तुरुंगात १२ नवीन पारदर्शक मुलाखत कक्ष तयार करण्यात आले आहेत. लवकरच त्यांचे उद्घाटन केले जाणार आहे. तुरुंग प्रशासनाच्या अंतर्गत राज्यात नऊ मध्यवर्ती, ३१ जिल्हा कारागृहे, तर १७२ उपकारागृहे आहेत.

राज्यातील विविध तुरुंगांत मिळून ३१ हजार २४१ कैदी आहेत. विविध गुन्ह्यांत तुरुंगवास झालेल्या कैद्यांना भेटण्याकरिता मुलाखत कक्ष असतो. काही मिनिटांच्या भेटीसाठी नातेवाइकांना कित्येक तास अगोदर यावे लागते. त्यामुळे मुलाखत कक्षाबाहेर गर्दी वाढून भांडण, शाब्दिक वादाचे प्रकार होतात. त्याची दखल घेऊन तुरुंग प्रशासनाने हा पर्याय शोधला आहे. मुलाखतीकरिता येणाऱ्या नातेवाइकांसाठीच्या 'अपॉइंटमेंट'चा उपक्रम संपूर्ण राज्यात राबवला जाणार आहे. मुलाखतीकरिता येणाऱ्या नातेवाइकांची माहिती अगोदर कळवावी लागणार आहे; प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार असून, त्यासाठी तुरुंग प्रशासनाने एक ॲप तयार केले आहे. मुंबई मध्यवर्ती कारागृहात (ऑर्थर रोड) १२ नवीन पारदर्शक कक्ष तयार करण्यात आले आहेत. त्या कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे, इंटरकॉमची सुविधा असेल.

# उपचारासाठी पैसे नसल्याने कंटाळून पतीने केली पत्नीची हत्या

**हापुड-** उत्तर प्रदेशमधील हापुड जिल्ह्यामध्ये पतीनेच पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कॅन्सरग्रस्त पत्नीच्या आजारावर औषधोपचार करण्यात खुप पैसे खर्च होत असल्याने वैतागलेल्या



पतीने पत्नीची गोळ्या घालून हत्या केली आहे. मृत महिलेच्या पतीने आपला गुन्हा कबूल केला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. मोहम्मद यूनुस(३२) असं या आरोपी पतीचं नाव आहे.

हापुड जिल्ह्यातील बझेडा गावात ही घटना घडली आहे. शनिवारी सकाळी मोहम्मद आपल्या जखमी पत्नीला घेऊन स्थानिक रूग्णालयात उपचारासाठी घेऊन गेला. त्याची पत्नी तबस्सुम बानोला(३०) गोळी लागली होती. मात्र रुग्णालयात उपचारादरम्यानच तबस्सुमचा मृत्यू झाला. शुक्रवारी रात्री काही दरोडेखोरांनी घरात घुसून आपल्या पत्नीला गोळी मारल्याचा बनाव मोहम्मदने रचला होता. तबस्सुमच्या वडिलांना मात्र मोहम्मदनेच आपल्या मुलीची हत्या केलाचा आरोप केला. त्यानंतर पोलिसांनी मोहम्मदची कसून चौकशी केल्यावर चौकशीदरम्यान त्याने हत्येची कबुली दिली. मोहम्मद साधा कामगार असून तो महिन्याला जेमतेम ५-६ हजार रूपये कमावतो. त्याच्या पत्नीला तोंडाचा कॅन्सर होता. पत्नीच्या औषधोपचारांसाठी त्याचे खुप पैसे खर्च होत होते. त्यामुळे खर्चाला कंटाळून पत्नीची हत्या केल्याचं त्यानं सांगितलं.

# मुलीच्या कौमार्याचा आईनेच केला १७ लाखांत सौदा, पोलिसांनी केला भांडाफोड

**मॉस्को-** आई आणि मुलीचे नाते हे अगदी वेगळे आणि तेवढेच सुंदर असते. त्याचे कारण म्हणजे मुलीवर आईचे जेवढे अधिक प्रेम असते. पण आईच आपल्या पोटच्या मुलीचा सौदा करते त्यावेळी त्या मुलीच्या मनावर काय बेतलं असेल याची कल्पनाच करवत नाही. आईच आपल्या पोटच्या मुलीच्या जिवावर उठल्याची धक्कादायक घटना रशियामध्ये पोलिसांनी उघड केली. रशियामध्ये आपल्या स्वतःच्या मुलीचे कौमार्य १७ लाख रुपयांत विकू पाहणाऱ्या आईला पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी स्टिंग ऑपरेशन करून तिला ताब्यात घेतले. रशियात घडलेल्या या घटनेत या महिलेने एका श्रीमंत व्यापाऱ्याशी सौदाही पक्का केला होता. ती मुलीला घेऊन विमानाने चेल्याबिंस्क येथून मॉस्कोला गेली होती, मात्र ती मुलीला सोपविणार त्यापूर्वीच स्थानिक पोलिसांनी तिला अटक केली. तिच्यासोबत तिच्या मैत्रिणीलाही अटक करण्यात आली. या महिलेचे नाव इरीना ग्लैडकिख असल्याचे पोलिसांनी सांगितले. ती ३५ वर्षांची असून ती बांधकाम व्यावसायिक आहे. आरोपी महिला आणि तिची मैत्रिण अल्पवयीन मुलीला घेऊन विमानाने गेली होती.



# शरद पवार यांच्यामुळेच शेतकरी देशोधडीला लागला -सुधीर सावंत

**अकोला –** ब्रिगेडिअर सुधीर सावंत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यामुळेच राज्यातील शेतकरी देशोधडीला लागला आहे. शरद पवार या देशाचे कृषिमंत्री होते, राज्याचे मुख्यमंत्री होते. मात्र तरिही त्यांनी राज्यातील शेतकऱ्याकडे दुर्लक्षच केले, असा घणाघाती आरोप केला आहे. शरद पवार यांनी, कृषिमंत्री असताना आणि मुख्यमंत्री असताना शेती उत्पादित मालाला हमीभाव देण्यासाठी कोणत्याही प्रभावी उपाययोजना केल्या नाही. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी न करता पवार यांनी शेतकऱ्यांना संकटात ढकलले असा आरोप ब्रिगेडिअर सावंत यांनी पत्रकार परिषदेत केला.




# १२ वर्षाखालील मुलींवर बलात्कार करणाऱ्यास फाशी

**चंदिगढ-** मागील आठवड्यात एकापाठोपाठ घडलेल्या बलात्काराच्या घटनांनी हरियाणा पुरतं हादरून गेलं आहे. या पार्श्वभूमीवर बलात्कारासारख्या अमानुष घटना रोखण्यासाठी हरियाणा सरकारने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री मनोहर खट्टर यांचे सरकार राज्यात एक नवीन कायदा आणण्याचा विचार करत आहे. या कायद्यामध्ये १२ वर्षांखालील मुलींवर बलात्कार करणाऱ्या गुन्हेगाराला फाशी देण्याची तरतूद करण्यात येणार आहे. अशी माहिती मनोहर खट्टर यांनी दिली.



याव्यतिरिक्त राज्य सरकार पीडित मुलींना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी आणि बलात्काराशी संबंधित प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टची स्थापना करणार आहे. राज्यात लागोपाठ झालेल्या घटनांमुळे हरियाणा सरकारवर चारही बाजूंनी टीका करण्यात आली असल्याने सरकारने या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करत ही पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. साधारणतः बलात्काराच्या ७५ टक्के घटनांमध्ये गुन्हेगार हे पीडितेच्या जवळचेच नातेवाईक असतात. पोलीस राज्यात घडलेल्या बलात्काराच्या घटनांचा कसून तपास करत असून लवकरच त्या नराधमांना अटक करण्यात येईल आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असे आश्वासनही खट्टर यांनी जनतेला दिले आहे. बलात्काराच्या घटना रोखण्यासाठी या आधी मध्यप्रदेश सरकारने बारा वर्षांखालील मुलींवर बलात्कार करणाऱ्यास फाशीची शिक्षा ठोठावण्याचं विधेयक मंजूर केले होते आता मध्यप्रदेशनंतर हरियाणात हे विधेयक लवकरच विधानसभेत मांडण्यात येणार आहे.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)